दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २१९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५




# दिशा सालियन प्रकरणी आदित्य ठाकरेंवर आरोप...

## उद्धव ठाकरेंची मोठी प्रतिक्रिया, म्हणाले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** दिशा सालियन प्रकरण पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत या प्रकरणाची सीबीआयद्वारे चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

तसेच आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल व्हावा, असेही ते म्हणाले आहेत. राजकीय दबावापोटी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊ शकली नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. या याचिकेनंतर सत्ताधाऱ्यांनी शिवसेनेवर (ठाकरे) जोरदार टिकास्त्र सोडले आहे. यानंतर आता आदित्य ठाकरे यांचे वडील तथा शिवसेनेचे (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली आहे.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

उद्धव ठाकरे विधीमंडळ परिसरात माध्यमांशी बोलत असताना त्यांना दिशा सालियन प्रकरण आणि आदित्य ठाकरेंवर केले गेलेल्या आरोपांबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, दरवेळी अधिवेशन आले की, हा मुद्दा बाहेर काढला जातो. मागच्या दोन-तीन अधिवेशनात हा मुद्दा कसा आला नाही? याचेच मला आश्चर्य वाटले होते. दरवेळी हा मुद्दा काढला जातो, यात नवीन काहीच नाही.

यानंतर उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, शेतकऱ्याच्या चिता पेटत आहेत, त्याला जबाबदार कोण आहे. शेतकऱ्याच्या माता भगिनी टाहो फोडत आहेत. संतोष देशमुख प्रकरणाप्रमाणे



अनेकांची हत्या झाली. त्यांची मुले न्याय मागत आहेत. त्याबद्दल सरकारची भूमिका काय? दिशा सालियनचे वकील काहीही सांगत असले तरी त्यांनी ते न्यायालयात सांगावे.

**खोट्याचा आधार घेत असाल तर...**

दरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंची पाठराखण केली आहे. याबाबत विचारले असता उद्धव ठाकरे यांनी त्यांचे आभार मानले. आमचे घराण्याच्या अनेक पिढ्या जनतेसमोर आहेत. आमचा या प्रकरणाशी दूर दूर पर्यंत संबंध नाही. पण राजकारण वाईट बाजूला न्यायचे असेल तर सर्वांचीच पंचाईत होईल. कारण खोट्याचा आधार घेत असाल तर ते तुमच्यावरही उलटेल.

**देवेंद्र फडणवीसांचे मानले आभार**

नागपूर दंगलीमध्ये ज्या दंगलखोरांनी महिला पोलिसांवर हात टाकला त्यांचे हात उखडून टाका, असे विधान उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नेत्यांचे कान टोचत चिथावणीखोर विधाने करू नयेत, अशी ताकीद दिली, याबद्दल उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. विरोधी पक्ष संपविण्यासाठी ज्या विषाचा त्यांनी उपयोग करायचा प्रयत्न केला, तेच विष आता भाजपाला मारत आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# 'भानुदास एकनाथ' च्या जयघोषाने अवघी पैठणनगरी दुमदुमली !

## नाथ षष्ठीच्या पहिल्या दिवशी लाखो भाविकांनी घेतले नाथसमाधीचे दर्शन

**अक्षराज : आशिष तांबटकर**

**दि.२०, पैठण (छ.संभाजीनगर)** : शांतीब्रम्ह संत श्री एकनाथ महाराज यांच्या नाथषष्ठी सोहळ्यास गुरुवारी मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. लाखो वारकऱ्यांच्याभानुदास एकनाथच्या जयघोषाने, टाळ मृदंगाच्या गजराने अवघी पैठणनगरी दुमदुमली आहे. पहाटे आमदार विलास भुमरे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते नाथ समाधी मंदिरात सपत्नीक महापुजा करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी रावळात वारकऱ्याचा वेश परिधान करुन टाळ मृदंगाच्या तालावर पावली खेळली. यावेळी उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तहसीलदार दत्ता भारस्कर, न.प. मुख्याधिकारी संतोष आगळे, दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, नाम देवराव खराद यांची प्रमुख उपस्थिती होती. दुपारी नाथांच्या वाड्यातून (आतील नाथ मंदिर) नाथवंशजांच्या नेतृत्वाखाली पहिली दिंडी (निर्याण दिंडी) काढण्यात आली. दिंडीत लाखो वारकरी सहभागी झाले होते.






यंदा नाथांच्या दर्शनासाठी पैठण नगरीत वारकऱ्यांचा गर्दीचा महापुर आला आहे. रस्ते वारकऱ्यांनी गजबजून गेले आहे. वारकऱ्यांच्या उपस्थितीने पैठणनगरी भक्तीमय झाली आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातुन आलेल्या शेकडो दिंड्या रविवारी नगरप्रदक्षिणा करुन आपल्या विविध ठिकाणी असलेल्या फडावर विसावल्या. षष्ठी सोहळयासाठी शेकडो दिंड्यामधून लाखो वारकरी व भाविक पैठणमध्ये दाखल झाले आहेत. नाथ षष्ठीच्या पहिल्या दिवशी वारकऱ्यांनी पहाटे गोदावरी नदी पात्रात व जायकवाडी धरणात पवित्र स्नान करुन नाथांचे दर्शन घेतले. दुपारी आतील नाथमंदिरातुन नाथवंशजांच्या नेतृत्वाखाली पहिली दिंडी (निर्यात दिंडी) काढण्यात आली. या दिंडीत अनेक दिंड्या सहभागी झाल्या होत्या. ही दिंडी गावातील नाथमंदिरास प्रदक्षिणा घालुन उदासी मठ मार्गे ही दिंडी गोदा वाळवंटातुन बाहेरील नाथमंदिरातील समाधीचे दर्शन घेऊन परत गावातील नाथमंदिरात आली. परत आल्यानंतर तेथे नाथवंशजाचे भजन व किर्तनाचा कार्यक्रम झाला.

नाथषष्ठीच्या दुसऱ्या दिवशी (दि. २१) रोजी सप्तमीला रात्री बारा वाजेच्या सुमारास गावातील नाथमंदिरापासुन नाथांच्या पादुकांची पालखी म्हणजे छबिना पालखी काढण्यात येईल. यात्रेत वारकऱ्यांच्या सुरक्षतेसाठी वारकऱ्यांना यात्रा महोत्सवात सुविधा देण्यासाठी नगर परिषदेने शहरात साफसफाई, ठिकठिकाणी फिरते शौचालये, दिंड्यांना फडावर स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले आहे.

वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी भासू नये यासाठी न.प. मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा विभागप्रमुख व्यंकटी पापुलवार, उपमुख्याधिकारी गर्जे, स्वच्छता निरीक्षक धर्मराज उजगरे, मुकुंद महाजन, अशोक मगरे, अशोक पगारे यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी परिश्रम घेत आहेत. नाथषष्ठी यात्रेत वारकऱ्यांच्या सुरक्षतेसाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला आहे.

वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी ठिकठिकाणी बॅरिकेड्स उभारुन वाहतुक सुरळीत ठेवली आहे. दोन्ही नाथमंदिर, गोदावरी वाळवंट, यात्रा मैदान, संत ज्ञानेश्वर उद्यान, जांभूळ वन आदी ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मंदिर परिसरात वारकऱ्यांचे चोरट्यांपासून व पाकीटमारांपासून वारकरी व महिला भाविकांचे संरक्षण व्हावे यासाठी यात्रेत साध्या पोशाखात पोलीस तैनात आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोरे, पो.नि. संजय देशमुख यात्रेवर लक्ष ठेवून आहेत.

# महाराष्ट्राच्या सुकांत, प्रेमची उपांत्यपूर्व फेरीत धडक ! आजपासून रंगणार ॲथलेटिक्सचा थरार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या सुकांत कदम, प्रेम अले यांनी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी देत खेलो इंडिया पॅरा स्पर्धेचा उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली आहे. दुसर्या पर्वाचे आज स्पर्धेचे शानदार उद्घाटन केंद्रिय क्रीडामंत्री मनसुख मंडविया यांच्या हस्ते झाले.

नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी क्रीडा संकुलातील जिम्नॉस्टिक्स हॉलमध्ये सुरू असलेल्या पॅरा बॅडमिंटनमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सकाळपासूनच दमदार कामगिरीचे प्रदर्शन घडविले. एस एल ४ गटात सांगलीचा सुकांत कदमने महाराष्ट्राच्याच निलेश गायकवाडचा २१ - १०, २१-१९ सेटने पराभव केला.जागतिक क्रमवारीत दुसर्या स्थानावर असणार्या सुकांतने पहिला सेट सहजपणे जिंकून लढतीवर पकड घेतला होती. दुसर्या सेटमध्ये त्याना संघर्ष करावा लागला.




अनुभवी सुकांतने आघाडी कायम राखत विजयी सलामी दिली. पॅरीस ऑलिम्पिकमध्ये चमकदार कामगिरी करणार्या सुकांत प्रथमच खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सहभागी झाला आहे. पुण्यात प्रशिक्षक निखिल कानेटकर, मयंक गोळे यांच्या मार्गदर्शनाव्दारे सराव करणार्या सुकांत स्पर्धेतील सुवर्णपदकाचा प्रमुख दावेदार आहे.शुक्रवारी उपांत्यपूर्व फेरीत सुकांतची लढत छत्तीसगडच्या अभिजीत सकुजा विरूध्द रंगणार आहे.

विलचेअरच्या डब्ल्यू एच १ गटात महाराष्ट्राच्या प्रेमकुमार अले यांनी उत्तरप्रदेशच्या सिराजउद्दीनवर सहज मात केली.२१-१२, २१-१४ सेटने प्रेमकुमार अले पहिली फेरी जिंकून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला. सेनादलातून निवृत्त झाल्यानंतर पॅरा बॅडमिंटन खेळण्याचा श्रीगणेशा पुण्यातून केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर १० सुवर्णपदकांचा कामगिरी करणारे प्रेमकुमार प्रथमच खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

शुक्रवार २१ मार्चपासून ॲथलेटिक्सचा थरार रंगणार आहे. ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता सचिन खिलारी दुखापतग्रस्त असल्याने दुसर्या स्पर्धेत खेळताना दिसणार नाही. गतस्पर्धेत खिलारीने सुवर्णपदक जिंकले होते. यंदा संदिप सलगर, भाग्यश्री जाधव, दिलीप गावीत या पॅरीस ऑलिम्पिकपटूं ॲथलेटिक्सचे मैदान गाजविताना दिसतील.

## थोडक्यात

### अंधेरी एमआयडीसीतभीषण आग

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** पवई येथील आग विझत नाही तोपर्यंत मुंबईत गुरुवारी अंधेरी परिसरातही आग लागल्याची घटना घडली. अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरात गुरुवारी दुपारी दोन वाजता भीषण आग लागली. दोन मजली इमारतीच्या गाळ्यातमध्ये ही आग लागली होती. आगीची तीव्रता जास्त असून अग्निशमन दलाने तीन क्रमांकाची वर्दी दिली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या दहा गाड्या व पाण्याचे आठ मोठे ट्रँकर घटनास्थळी आहेत.

मुंबईत दिवसभरात आगीच्या दोन घटना घडल्या. पवई येथील गगनचुंबी इमरतीत लागलेली आग पूर्णत: विझत नाही तोच अंधेरीतील एमआयडीसी परिसरात दुपारी दोनच्या सुमारास आग लागली. अंधेरी पूर्वेकडील महाकाली गुंफा मार्गावर शांती नगर परिसरात न्यू इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये एका दुमजली बांधकामात ही आग लागली होती. दुमलजी बांधकामतील एका गाळ्यात ही आग लागली होती. एक हजार चौरस फूट परिसरात ही आग लागली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाबरोबरच, पालिकेच्या विभाग कार्यालयाचे कर्मचारी, पोलीस यंत्रणा दाखल झाली आहे. अग्निशमन दलाचा मोठा ताफा आणि रुग्णवाहिका देखील दाखल झाल्या आहेत. आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, एमआयडीसीमध्ये विविध उद्योगधंद्यांचे गाळे असून या ठिकाणी आग लागल्यास त्याची भीषणता जास्त असते. दीड वर्षांपूर्वी या परिसरात लागलेली आग विझवण्यासाठी तब्बल बारा तास लागले होते. या परिसरातील गाळ्यांमध्ये विविध वस्तूंची गोदामे असतात. त्यात अनेकदा ज्वलनशील पदार्थही असतात. त्यामुळे अग्निशमन दलाने आधीच या तीन क्रमंकाची वर्दी दिली.

### गुन्हा दाखल केल्याच्या रागातून तरुणावर वार

**दि.२०, पुणे :** पूर्वी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या रागातून टोळक्याने तरूणाला बेदम मारहाण करीत त्याच्यावर वार करून गंभीररित्या जखमी केले. त्याच्या आईवरही वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी वार चुकविल्यामुळे दुखापत झाली नाही. त्यांना लोखंडी सळईने मारहाण केली. मार्केट यार्ड परिसरातील भिमाले कॉम्प्लेक्ससमोर १४ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी १५ जणांविरूद्ध मर्केट यार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सनी उर्फ योगेश पारडे (वय ३५), तेजस गजरमल (वय २५). गणेश भुम्बे (वय २७), साहिल गजरमल (वय २२), सुभाष नाईकिंदे (वय ४०), प्रवीण उर्फ अशोक पाटोळे (वय ३५), सागर पारडे (वय ४०), सूरज पारडे (वय २९), रामा गजरमल (वय ४५), चंदर गायकवाड (वय ५०), रोहित चंदर गायकवाड (वय २७), अनिता गरजमल (वय ३७), भारती गरजमल (वय ३६), चतुरा पारडे (वय ४५) आणि सपना पारडे (वय २७) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी जयश्री युवराज वाघमारे (वय ४३ रा. संदेशनगर मार्केट यार्ड) यांनी फिर्याद दाखल केली आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक सुवर्णा पवार तपास करीत आहेत.

## संपादकीय

### महाबँक कर्मचाऱ्यांचा देशव्यापी संप

सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ म हाराष्ट्रमधील (महाबँक) ‘एआयबीईए’ या संघटनेने गुरुवारी देशव्यापी संपाची हाक दिली आहे. बँकेतील सर्व श्रेणीतील कर्मचाऱ्यांची नोकरभरती, कर्मचाऱ्यांशी निगडित सर्व प्रश्नांवर द्विपक्षीय वाटाघाटीतून तोडगा, कायद्यातील तरतुदीचे, उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे या मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांशी निगडित विविध प्रश्नांवर तिसऱ्या फेरीत मुंबईच्या कामगार आयुक्तांशी चर्चेची आणखी एक फेरी झाली. मात्र व्यवस्थापन आठमुठी भूमिका घेत असल्यामुळे कुठलाही तोडगा निघाला नाही आणि त्यामुळेच महाबँकेतील कर्मचारी संपावर जाण्यावर ठाम आहेत. संघटनेच्या वतीने देशभरातून निदर्शने, मोर्चे, मेळावे धरणे, मोर्चे अशा निषेधात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारच्या संपानंतर, २१ मार्च रोजी एक दिवस बँकेचे व्यवहार सुरू असतील. मात्र पुन्हा २२ आणि २३ मार्च रोजी साप्ताहिक सुटीनंतर २४, २५ मार्चला नऊ राष्ट्रीय संघटनांनी एकत्र येऊन बनविलेल्या ‘युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन’च्या संपाच्या आवाहनानुसार, इतर बँकांसह महाबँकेचे कामकाज त्या दोन दिवशी बाधित होईल. यातून ग्राहकांची म ोठी गैरसोय टाळण्यासाठी होण्याची शक्यता आहे.

# मानव मुक्तीचा सत्याग्रह...!

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.

२) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत.

३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित

४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे.

याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी म हाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला सम ानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# आठवणीतले मास्तर...

बऱ्याच लोकांच्या आयुष्यात भाऊ, दादा, नाना, शेठ, डयाडी, साहेब अशा आदरार्थी ’नावाने ’ एक वेगळं घर केलेले असते. अशापैकीचं माझ्या आयुष्यातलं अन लोकांनी प्रेमाने जपलेल नाव म्हणजे मास्तर . मास्तर म्हणजे माझे आजोबा. अगदी पेशाने मास्तर नाही पर आपल्या चाणाक्ष बुद्धीने अन स्वकर्तृत्वावर, जिव्हाळ्याने कमावलेलं नाव म्हणजे म ास्तर. अंगावर निळा फुल हाताचा शर्ट, त्यावर छोटे चेक्सचा लाल किंवा नीळा कब्जा ( जॅकेट ), गोल धोतर, डोक्यावर गांधी टोपी, हातात पान, सुपारी अन खणाची झालर असलेली कापडी पिशवी, अन करावं करावं आवाज करण्याऱ्या चामड्याच्या वाहना असा अगदी ठेवणीतला रुबाब.

कोकणात भातशेती हा प्रमुख व्यवसाय. म्हणजे एक जमाना असा असायचा की घराच्या बाजूला देखील भातशेती केली जायची. मास्तरांचा देखील भातशेती हा प्रमुख व्यवसाय होता. जोड धंदा म्हणून ते लाकडाचा व्यापार करायचे. घरात किंवा उंबराच्या झाडाला मोठाला तराजू लावलेला असायचा. आम्ही लहान पोरं त्यावर स्वतःचे वजन करायचो. नाहीतर सी सॉ खेळायचो. एक वेगळीच मजा होती ती. शेती प्रमुख व्यवसाय असल्यांने बैल जोडी ही मास्तरांची आवड होती. पूर्वी मास्तरांची बैल गाडी देखील होती. बैल कसा पाहिजे तर पांढरा शुभ्र, सुंदर, पोपट, निशाण, राजा, माणिक असे कितीतरी बैल मास्तरांच्या वाड्यात (गोठयात ) आले. मग त्या बैलांना पाणी, चारा, पेंड, आंबवन घालणे ही काम मास्तर स्वतः अगदी जातीने करायचे. मास्तरांकडे आलेला बैल तसा नशीबवानच समजायचा. मास्तरांकडे असलेल्या जर्सी गाईचं त्यांनी तिच्या उतरत्या वयात खूप चांगलं संगोपन केलं. ते तिला लक्ष्मी मानायचे. अगदी एकाद्या घरासारखा भला मोठा मास्तरांचा गोठा होता. म्हणजे त्या गोठयात जेवणाची पंगत देखील बसवली तर माणस खुशीने जेवतील इतका टाप टीप. तसा मास्तरांचा स्वभाव अगदी प्रेमळ अन थट्टा मस्करी करणारा. अगदी निवांत वेळी वाडीतला एखाद पोर समोरून चाललं असलं तर त्याला अमक्या पोरीच्या नावाने चिडवणे वा पोरींना तमक्या पोराच्या नावाने चिडवणे हा मास्तरांचा छोटासा विरंगुळा. मे महिनाच्या सुट्टीत मुंबई वरून आपली नातवंड येणार अशी खबर लागली मास्तर जाम म्हणजे जाम खुश. मग काय नातवांसाठी अगोदरच आंब्यांची आडी तयार. चिल्लर पार्टीला सकाळी रानात घेऊन जाणे हा मास्तरांचा मे महिन्यातील नित्याचा दिनक्रम. रात्रीच जेवण आटपल की अंगणात मस्त गप्पा गोष्टी रंगायच्या. अधी- मधी- कधी मास्तर त्यांच्या विशिष्ट्य लकबमध्ये एक गोष्ट सांगायचे तर कधी उखाणे (कोडी) घालायचे. मास्तरांची एक आरामखुर्ची होती. मास्तर खुर्ची वरून उठले रे उठले की आम्ही पोरं त्या खुर्चीवर बसण्यासाठी तडमडायचो. पण मास्तर येताना दिसले की लागलीच खुर्ची खाली करायचो. त्या अजाण वयात देखील मास्तरांबद्दल इतका आदर होता. आज मास्तरांची नातवंड मोठी झाली. स्वतःच्या पायावर उभी राहिली. मास्तरांच्या घराला स्पारटेक्सच्या लाद्या लागल्या. चिऱ्याच्या भिंतीना कॉंक्रिटचा मुलामा आला, घराची डागडुजी झाली, पण मास्तर निघून गेल्याची पोकळी कायमची राहून गेली. आज पुन्हा एकदा मास्तरांनी डोळ्यांच्या कडा ओल्या केल्या. खरंच आयुष्य खुप सुंदर आहे, का तर आयुष्यात मास्तरांसारखी माणसं आली.

**वैभव वाघे, भाईंदर**
**७७३८२०१३६३**

# वाशीमध्ये नमुंमपा चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दि.२१ ते २३ मार्च २०२५ रोजी वाशीमध्ये ‘नवी मुंबई म हानगरपालिका चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०२४-२५’ चे आयोजन करण्यात आलेले असून या माध्यमातून राज्यातील नामांकित व्हॉलीबॉल संघ आपले कौशल्य प्रदर्शित करणार आहेत.

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन आणि नवी मुंबई ॲमॅच्युअर व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच कर्मवीर भाऊराव पाटील म हाविद्यालय, वाशी यांच्या सहयोगाने संपन्न होणाऱ्या या ३ दिवसीय स्पर्धेत १६ पुरूष व ८ महिला संघांतील अत्यंत नामवंत व राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असणाऱ्या खेळाडूंचा खेळ बघण्याची संधी नवी मुंबईकरांना प्राप्त होणार आहे.

या स्पर्धा शुक्रवार, दि.२१ मार्च पासून रविवार, दि.२३ मार्च २०२५ पर्यंत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (मॉडर्न कॉलेज), वाशी येथे संपन्न होणार असून स्पर्धेतील विजेत्या संघांना रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह तसेच वैयक्तिक सर्वोत्कृष्ट खेळाडूंनाही विशेष पारितोषिके व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेचा शुभारंभ शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ रोजी सायं.६ वा. तसेच पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि.२३ मार्च २०२५ रोजी, सायं.७ वा. संपन्न होणार आहे. तरी नवी मुंबईमधील तमाम क्रीडाप्रेमी नागरिकांनी या स्पर्धांच्या निमित्ताने नवी मुंबईत येणाऱ्या नामवंत व्हॉलिबॉलपटूंचा खेळ बघण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रस्तोरस्ती...

वाद चालला रस्त्या
जुंपते जोरातकुस्ती
निघेना मुळी तोडगा
अंगात भरली मस्ती

मध्ये पडेना कुणीचं
आफत नको नसती
बघ्यांची तुफानगर्दी
पहावी मजा नुसती

विझत येता भांडण
जोडतो कुणी पुस्ती
फुकटातला तमाशा
पहायला येते चुस्ती

भांडणा-याला खरी
आतूनअसते धास्ती
वाटत असते सारखे
करो कुणी मध्यस्ती

मारतो मारतो म्हणे
हातवारे करे जास्ती
बसू नये वर्मी घाव
प्रत्येकां असे धास्ती

दुर्लक्ष करतोपोलिस
असून जवळ गस्ती
मनामधली खदखद
बाहेर पडावी मस्ती

हळू हळू निवळे ती
बघ्यांची सारी वस्ती
अशा प्रकारे भांडणे
चालतात रस्तोरस्ती

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... बातमी

# विवाह समारंभातील वाढत्या अपप्रवृत्ती थांबवा !

‘हम आपके है कौन...! ’ हा ’ फॅमिली ड्रामा ’ चित्रपट १९९४ मध्ये आला होता. राजश्री प्रोडक्शन चा हा सिनेमा भारतीय संस्कृती आणि संस्कार यावर आधारलेला आहे. त्याकाळी लोकांना हा सिनेमा प्रचंड आवडला. पुढे पुढे या धाटणीचे काही सिनेमे आले. त्यालाही लोकांनी चांगला प्रतिसाद दिला.लोकांना नटखटपणा, प्रेमसंबंध, भावनिकता, नातेसंबंधातील हळुवारपणे सुटत जाणारी वीण... त्यांच्यात होणारी घुसमट, रीती रिवाज, परंपरा, सभ्यता, शालिनीता आणि त्याला जोड म्हणून उत्कृष्ट संगीतबद्द झालेली गाणी असा सर्व मसाला असणारे कौटुंबिक चित्रपट खास आवडतात. हे सर्व हम आपके है कौन! मध्ये होतं.



या चित्रपटातील विवाह समारंभ हा सर्वात आकर्षणाचा भाग होता. विवाहातील विविध विधी,परंपरा आणि कार्यक्रम लोक सिनेमागृहात नसून विवाह समारंभात सहभागी झाल्याची अनुभूती देत होते. या लग्न समारंभातील एक मेकांची मजा मस्ती करतानाची दृश्य पुढील काळात भारतीय विवाह पद्धतीचे भाग बनले. त्यातीलच ’ जूते ले लो पैसे दे दो...’ म्हणत होणाऱ्या भाऊजीचे पायताने लपवून पैसे मागण्याऱ्या मेहुणीचा समाजावर फार मोठा प्रभाव पडला. पुढील काळात या सिनेमा नंतर सप्तपदी,अक्षता सोहळा,हळदी या विवाहातील विधीप्रमाणे ’ पादुका चौर्य ’ हा एक सोपस्कार पार पडू लागला. एक प्रकारे समाजमान्यता या वात्रटपणाला मिळाली आहे, असे आपल्याला म्हणता येईल . सिनेमा समाजाला कसा प्रभावित करतो, अपप्रवृत्ती, चुकीचे पायांडे कसे घालून देतो असे अनेक सामाजिक घटना, घडामोडी मध्ये चित्रपटामुळे झालेले बदल पाहून ध्यानात येते.

आज-काल विवाह सोहळ्यात मेहुना,म ेहुणी आपल्या होणाऱ्या लाडक्या भाऊजींचे पायताने चोरतात. यातून विवाह सोहळ्यात वादविवाद, भांडण- तंटे आणि हाणामाऱ्या होतात . खर तर लोक ’ जूते चोरी ’ या सिनेदृश्याचे अंधानुकरण करतील याची कल्पनाही सिनेमा बनवणाऱ्याला नसेल. सिनेमात रंजकता वाढवण्यासाठी प्रत्येक सिनेमात असे नवनवीन प्रयोग केलेले असतात. असंच ‘दिल’ या सिनेमांमध्ये कॉलेजला जाणाऱ्या तरुणीची छेड काढण्याची दृश्य आहेत. आमिर खानने जेव्हा ‘सत्यमेव जयते !’ हा कार्यक्रम एका वाहिनीवर केला, तेव्हा एका भागामध्ये मुलींची छेड काढण्यातून घडलेल्या गुन्ह्यांची, मुलींवर च्या अन्यायाची दखल घेण्यात आली होती. त्यावेळी स्वतः आमिर खानने आपली ’ दिल ’ सिनेम ातील मुलींची छेड काढणारी भूमिका चुकीची होती याबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती.

एकमेकांची मजा मस्ती करताना कुठपर्यंत ताणून धरायचे हे नवतरुणांना ठाऊक नसते. अतिउत्साह आणि उतावळेपणा याने तरुण-तरुणी विवाह सोहळ्यात भारावून गेलेले असतात. विवाह सोहळ्यातून एकमेकांशी मैत्री,नातेसंबंध वाढवले पाहिजेत! ओळखी करून घेतल्या पाहिजेत! म ानसन्मान राखला पाहिजे! पण हे दूरच राहते उलट या अपप्रवृत्तीमुळे वैरभाव वाढीस लागतो.

आजकाल विवाह सोहळ्यात मद्यप्राशन करणे, वेडेवाकडे नृत्य करणे, मर्यादे पलीकडे जाऊन समोरच्याची टिंगल टवाळी करणे, अक्षता सोहळ्यानंतर वधू-वरांना हार घालण्यासाठी उंच उचलून धरणे यासारख्या अपप्रवृत्ती वाढत आहेत. ज्येष्ठ मंडळी विवाह सोहळ्यात व्यवस्थापन आणि आदरतित्य करणे यामध्ये गुंतलेली असतात. अशा काळात नव तरुणांनी ज्येष्ठ मंडळींना मदत करणे सोडून उलट त्यांच्या चिंतेत भर घालण्याचे काम करणे थांबवले पाहिजे. विवाह सोहळ्यात होणारा खर्च, येणारा ताण तणाव याला तोंड देता देता ज्येष्ठ मंडळी दमून गेलेली असतात. त्यांच्या शांत राहण्याचा, संयम आणि मजबुरीचा फायदा तरुणांनी अशा कार्यक्रमात घेऊ नये.

विवाह समारंभ म्हणजेच दोन मनांना जोडणारा, एक संसार उभा करणारा कोणाच्यातरी जीवनातील अति महत्त्वाचा प्रसंग आहे,याचे भान सोहळ्यात सहभागी होणाऱ्या तरुणांनी ठेवले पाहिजे. स्वतःमध्ये निर्माण होणाऱ्या उत्साहाला बांध घालून स्वतःच्या सभ्यतेचे, शहाणपणाचे आणि नम्रतेचे दर्शन सर्वांना घडवले पाहिजे. विवाह समारंभात निम ाण होत असणाऱ्या अपप्रवृत्तीचे अंधनुकरण करणे तरुणांनीच थांबवले पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कोपरखैरणे येथे प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** प्लास्टिक पिशव्या तसेच एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर थांबविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका व्यापक प्रमाणावर जनजागृती करीत आहे, त्यासोबतच बाजारपेठांमध्ये पाहणी मोहीमा राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत परिमंडळ २ च्या भरारी पथकाने कोपरखैरणे सेक्टर १४ येथील महावीर फालुदा या व्यावसायिकाकडून १ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करीत ५ हजार रक्कमेची दंडवसूली करण्यात आली. त्याचप्रमाणे सेक्टर १४, कोपरखैरणे येथील फ्रेंड सर्कल दुकानात प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने त्यांच्याकडून रू.५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली व १.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला.

प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला पोहचणारी हानी लक्षात घेता नागरिकांनी जागरूक होऊन प्लास्टिक पिशव्यांना वापरातून हद्दपार करावे व कापडी पिशव्यांचा अंगिकार करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत असून कागदी पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठी तपासणी मोहीमाही राबविण्यात येत आहेत.

## डोंबिवलीतील सामाजिक संस्थेकडून ना फेरीवाले क्षेत्र करण्याची मागणी



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२०, डोंबिवली (ठाणे) :** पूर्वीचा असलेला घरडा सर्कलची पुणर बांधणी करून महारष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजाचे अश्वारूढ स्मारकाचे लोकार्पण दिनांक १७/०३/२०२५ रोजी मा उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यापूर्वी या चौकात अनेक फेरीवाले अनधिकृतपणे आपले बस्थान मांडून बसले होते पण आता या चौकात छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक तयार करण्यातआले असून याचे पावित्र्य आपण सर्वानी जपणे अपेक्षित आहे. यासाठी या चौकातील सर्व परिसर ना फेरीवाले क्षेत्र घोषित करून येथे फलक लावण्यात यावे व येथे कोणीही अतिक्रमण करुनये या साठी सेफ्टी वेल्फेअर असोसिएशन या सामाजिक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष, विशाल शेटे यांनी विनंती अर्जा द्वारे कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाकड यांच्या कडे मागणी केली आहे तसेच हा क्षेत्र महाराष्ट्रे औधोगिक विकास महामंडळ यांच्या अख्यारीत येत असल्या कारणाने येथील कार्यकारी अभियंता डोंबिवली पूर्व कार्यालय यांना सुद्धा ना फेरीवाला क्षेत्रे घोषित करण्याचे विनंती अर्ज देण्यात आला आहे याची अंमलबाजवणी लवकरात लवकर व्हावी आणी येथे पुन्हा फेरीवाले व खाद्य पदार्थ विक्रेते यांनी आपले बस्थान बसवू नये अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विशाल शेटे यांनी केली आहे.

## कर्मयोगी मधुकर माळी यांची सेवापूर्ती




**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२०, मुंबई :** आपल्या कर्मातच देव शोधणाऱ्या व उभं आयुष्य शाळा,विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या सानिध्यात घालवणाऱ्या शारीरिक शिक्षण विभागाचे फ/उत्तर चे कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी हे नियत वयोमानानुसार येत्या १ एप्रिल २०२५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जवळजवळ ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.आज बुधवार रोजी त्यांचा सेवापूर्ती समारंभ सायन येथील जोगळेकर वाडी मनपा शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी विभाग निरीक्षक जगदीश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या समारंभाला बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मध्यवर्ती उपशिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे,उपशिक्षणाधिकारी ममता राव,

उपशिक्षणाधिकारी छाया साळवे, ज्योती बकाने, आरती खेर, अधिक्षक लक्ष्मण गोसावी, फ/उत्तर विभागाचे प्रशासकीय अधिकारी व सत्कार समारंभाचे निमंत्रक किसन पावडे, जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे, शारीरिक शिक्षण विभागाचे वरीष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे, प्राचार्या सत्यशीला कांबळे, अनिल सनेर, फ/ उत्तर विभागाच्या विभाग निरीक्षिका पूजा पाटील, माजी कनिष्ठ पर्यवेक्षक कुनील सोनावणे, धैर्यधर पाटील यांच्यासह बहुसंख्य मुख्याध्यापक, सेवानिवृत्त अधिकारी, शिक्षक यांची उपस्थिती होती.

## भिवापूरचे पो.नि. निर्मल यांची मालेवाडा येथील शाळेला भेट



**अक्षराज : रजत डेकाटे**

**दि.२०, भिवापूर :** भिवापूर तालुक्यातील अंतर्गत येत असलेल्या मालेवाडा येथील जिल्हा परिषद शाळेला भिवापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल यांनी भेट दिली व शाळेतील रंगरंगोटीची पाहणी केली होत असलेल्या रंगरंगोटीबाबत चर्चा करत शाळेच्या व गावाच्या विकासासाठी मदत करा. शाळेला प्रशासनाकडून निधी मिळत नाही आपण सहभागी होऊन शाळेला सहकार्य देत शाळा पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे भिवापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल म्हणाले. व दारूबंदी बाबत सुध्दा गावातील काही नागरिकांसोबत चर्चा करत दारू बंदी वर आळा घालण्यासाठी स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे येत पोलीस प्रशासनाला मदत करावी असेही पोलिस निरीक्षक जयप्रकाश निर्मल म्हणाले गावातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी गाव सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीत असणे गरजेचे आहे. यावेळी पोलीस निरीक्षक निर्मल यांनी उपस्थित ग्रामपंचायत मधील पदाधिकाऱ्यांना सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत मासिक बैठकीत चर्चा करा म्हणाले.

सरपंच राखी इंगोले, उपसरपंच फुलचंद मेश्राम, मुख्याध्यापिका शिला रोडे, पोलीस पाटील इंदु गेडाम, तंटामुक्त समिती अध्यक्ष यशवंता सातपुते,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रमेश लोनगाडगे,रेकचंद मेश्राम,लहु सहारे, अमृत चौधरी, यावेळी उपस्थित होते.

## नांदेड जिल्हयातील शिक्षक समन्वय संघाने सामूहिक आत्मदहनचा दिला इशारा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले व दि.२६ मार्च रोजी सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला.



१४ ऑक्टोंबर२०२४ च्या शासन निर्णयातील पदांना पुरवणी अर्थसंकल्प २०२४, पुरवणी मागण्या २०२५ व अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये निधीची तरतूद न केल्याच्या संदर्भात. उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास मा.जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सविनय निवेदन सादर करण्यात येत आहे की तत्कालीन महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळांनी दि.१० ऑक्टोंबर २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीच्या मान्यतेने दि.१४ ऑक्टोंबर २०२४ चा शासन निर्णय काढला यासाठी सातत्याने राज्यात तसेच आझाद मैदान मुंबई येथे शिक्षक समन्वय संघाच्या वतीने महाएल्गार आंदोलन करण्यात आले होते, या आंदोलनाची फलनिष्पत्ती म्हणून शासन निर्णयातील एकूण पात्र ५२ हजार पदांना शासन निर्णयात म्हटल्याप्रमाणे त्यांच्या हेडनिहाय अनिवार्य खर्च म्हणून नागपूर येथील डिसेंबर २०२४ च्या पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद होणे अपेक्षित होते परंतु शिक्षण खात्याला पूर्णवेळ मंत्री उपलब्ध न झाल्याने या विषयाची पुरवणी मागणी मंजूर झाली नाही असे असंवैधानिक उत्तर राज्यातील शिक्षकांना देण्यात आले परंतु समाज घडवणाऱ्या या शिक्षकांनी मोठ्या मनाने चला पुढे जाऊया या संकल्पनेतून निदान अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये सादर झालेल्या पुरवणी मागण्या किंवा पूर्ण अर्थसंकल्पात तरतूद होईल अशी भाबडी अपेक्षा सरकारकडे ठेवली तसेच राज्यात सरकार विरोधात कुठेही आंदोलन उभे केले नाही परंतु पुरवणी मागण्या व पूर्ण अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये या शासन निर्णयातील पदांना टप्पा वाढीसाठी अपेक्षित तरतूद या शासनाने न केल्याने राज्यातील शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला व त्यातूनच परवा राज्यातील बीड येथील धनंजय नागरगोजे यांनी गळफास लावून आत्म हत्या केली तर आणखीनच अन्य ४ बांधवांचा नैराश्यामुळे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला हे झालेले मृत्यू नैसर्गिक नसून सदरील शिक्षकांची हत्या ही शासनाने केलेली आहे शासन एकीकडे मंत्रिमंडळात निर्णय घेऊन त्यांचा शासन निर्णय काढत असेल व त्यास निधी मंजूर करत नसेल तर हे बेकायदेशीर व घटनाबाह्य आहे त्यामुळे राज्यातील तमाम ५२ हजार शिक्षकांची शुद्ध फसवणूक आहे अशी भावना आम्हां शिक्षक बांधवात निर्माण झाल्याने आता या राज्य सरकारवर कुठलाही विश्वास आमचा उरलेला नाही आमची मागणी ही अत्यंत जुनी २० वर्षापासून ची ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्यां गुरुजनांची असून या मागणीसाठी अत्यंत तुटपुंजी रक्कम म्हणजे फक्त ८२६ कोटी रुपयांची असताना तसेच शेकडो आंदोलने,लाठीमार,तुरुंगवास ह्या शिक्षकांनी सोसलेला असताना शासन जर दिवसाढवळ्या बुद्धिजीवी शिक्षकांची अशी शुद्ध फसवणूक करत असेल तर आमच्यासमोर आता जिवंतपणी मेल्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय आम्हाला शिल्लक दिसत नसल्याने आम्ही दि. २५ मार्च २०२५ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय. येथे दुपारी १.०० वाजता निवेदना सोबतच्या सहपत्रावर सह्या असणारे व नांदेड जिल्ह्यातील सर्व प्राथमिक माध्यमिक व उच्चमाधामिक अंशतः शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधव सामूहिक आत्मदहन करीत आहे,आमच्या मृत्यू पश्चात आमच्या मुला बाळांची व कुंटुबांच्या पुर्नवसनाची जबाबदारी ही शासनाने घ्यावी तसेच आत्मदहन आंदोलना दरम्यान झालेल्या मृत्यूला सर्वस्वी शासन व प्रशासन जबाबदार असेल यांची नोंद घ्यावी यावेळी कैलाश खानसोळे ,नालंदे डि. आर, गोविंद वाघमारे,आशिष केंद्रे, दिगांबर माने, सुदर्शन फाजगे,अंब्बरवाड टि. डी, सोनटक्के आर एन, नागनाथ हिप्परगेकर यांसह जिल्हयातील सर्व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार आहेत.

## पशुधन घटल्याने शेणखत मिळेना... शेतकऱ्यांची अडचन...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, धुळे :** खरीप हंगामाची पूर्वतयारी करताना शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे जोमाने सुरु केली मात्र बैला पेक्षा यंत्राद्वारे कामांना जास्त पसंती दिली जात आहे. त्यामुळे मागील काही वर्षात पशुधन मोठ्या प्रमाणात घटले. त्यातच आता रासायनिक खताचे दर गगनाला भिडले आहेत. पशुधन घटल्याने शेतीला पोषक ठरणारे शेणखत मिळणे कठीण झाल्याचे चित्र परीसरात पहावयास मिळत आहे.शिरपुर तालुक्यातील त-हाडी परीसरित पशुधन कमी झाल्याने शेतीमध्ये शेणखताचा वापर कमी झाला.



परिणामी उत्पादनात घट होत चालली असल्याचे दिसून येत आहे, तर रासायनिक खताचा अति वापरामुळे जमिनीची पोत खालावत आहे.पुर्वी ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात पशुधन असायचेः परंतु पशुधनावर होणारा खर्च व त्यातून वाढत्या यांत्रिकीकरणाचा परिणाम मिळणारे उत्पन्न यात तोटा होत असल्याने, तर काही शेतकऱ्यांनी आर्थिक संकटामुळे पशुधनाची केलेली विक्री यामुळे शेणखताचे प्रमाण मात्र कमी झालेले आहे.

पूर्वीच्या काळी भरघोस मिळणारे शेणखत आता मात्र दुरापास्त झालेले आहे. शेणखताच्या वापरामुळे शेतीची पोत सुधारुन दर्जा वाढतो. भरघोस उत्पादनासाठी शेणखत फायदेशीरच आहे. या खतामुळे रासायनिक खताचा वापर कमी प्रमाणात होत होता. त्यामुळे मानवी आरोग्यावर विशेष परिणाम दिसून येत नव्हताः परंतु पशुधनाच्या शेतकऱ्यांना कमतरतेमुळे नाईलाजास्तव रासायनिक खताचा वापर करावा लागत आहे.

असा सुधारेल शेतीचा पोत...

शेणखत पारंपरिक सेंद्रिय आहे. शेतकऱ्यांना ते शेतात उपलब्ध होऊ शकते. जनावरांच्या गोठ्यातील शेणामध्ये जनावराचे मूत्र आणि अर्धवट खाऊन टाकलेल्या चाऱ्याचे अवशेषही असतात. गोठ्याच्या कडेला माती टाकून त्यात जनावरांचे मूत्र सोपून घेता येते. ती माती जर शेणखताच्या खड्ड्यात टाकली, तर शेतीचा पोत सुधारते. सर्वसाधारणपणे चांगल्या कुजलेल्या शेणखतात ०.४ टक्के नत्र, ०.१५ टक्के स्फूरद आणि ०.५० टक्के पालाश असते. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकवून पिकाचे भरघोस उत्पादन वाढविण्यासाठी शेणखतासारख्या सेंद्रिय खताचा वापर करणे आवश्यक आहे.

मानवी आरोग्य धोक्यात...

मानवी आरोग्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज आहे. रासायनिक खताचा वाढलेला वापर, उत्पादन घेण्याची स्पर्धा कीटकनाशकांचा अतिवापर, यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येत आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक खताचा वापर न करता माती परीक्षण करून जमिनीला कोणते घटक आवश्यक आहेत. ती मात्रा देण्याची गरज आहे.

## तहसील कार्यलयात मतदार याद्या आद्ययवत चर्चासत्र...

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्या तयार करणे पुनर्रक्षण व अद्यावत करने प्रक्रियेचा महत्वाचा भाग असल्याने स्थानिक स्तरावर विचार विनिमय करण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बोलाविण्यात आलेल्या बैठकीतील चर्चा सत्रात स्थलांतरित मतदारांना वगळण्याचा मांडण्यात आलेल्या ठरावास सर्वांनी संमती दर्शवली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये मतदारयाद्या अद्ययावत करण्यासाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. तहसील कार्यालयात प्रमुख राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्याच्या सूचना देण्यात आली होती या अनुषंगाने मुदखेड तहसील कार्यालयात दि १८ मंगळवारी रोजी सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी अध्यक्षस्थानी होते तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी शासन परिपत्रकाचे वाचन करून मतदार याद्या तयार करणे पुनर्रक्षण व अद्यावत करने या बाबत सविस्तर चर्चा केली.

स्तलांतरित मतदारांना वगळण्याचा मुद्दा कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांनी मांडला. या ठरवास सर्वानुमते



संमती दर्शिवण्यात आली. स्थलांतरित मतदार निवडणुकीच्या वेळी फक्त गावात मतदानासाठी येत असतात.

वात्सव्य कोसो दूर असल्याचे निर्दर्शनास आणुन दिले. यावेळी निवडणूक अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी याबाबत हरकती घेण्यात येतील असे सांगितले . स्थलांतरित मतदारांची सखोल चोकशी करून मतदार यादीतून वगळण्यात येण्यासाठी नोटीसा बजावून आठ दिवसाचा वेळ देऊन निर्णय घेतला जाईल.

या बैठकीस ,कॉंग्रेस तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी पाटील खटींग कॉंग्रेस कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, शहर अध्यक्ष कैलास गोडसे, भाजप शहर अध्यक्ष संजय सोनटक्के, वंचित बहुजन तालुकाध्यक्ष मोहनराव कांबळे, युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, शिवसेना शिंदे गटाचे सचिन माने, रिसर्च सेल कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष माधव हामंद, युवक कॉंग्रेस सरचिटणीस आकाश सोनटक्के, यांच्यासह प्रमुख राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## हवेत गोळीबार करून दहशत निर्माण करणाऱ्या पाच आरोपींना केले जेरबंद

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२०, लोणीकंद (पुणे) :** दिनांक १२/०३/२०२५ रोजी रात्रीच्या सुमारास इसम नामे अजित महादेव जाधव, वय २६ वर्ष धंदा शेती रा बकोरी ता. हवेली जि. पुणे व इसम नामे गणेश संजय चौधरी, वय २९ वर्ष रा मु पो वाडेगाव भोर वस्ती ता हवेली जि पुणे या दोघांमध्ये झालेल्या वैयक्तिक वादाचे कारणावरून वाडेबोल्हाई येथे झालेल्या भांडणाचे वेळी हवेत गोळीबार झाल्याची घटना घडल्याने दिनांक १३/०३/२०२५ रोजी गणेश संजय चौधरी व त्याचे इतर साथीदार मित्र याच्याविरुद्ध लोणीकंद पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.




सदर गुन्ह्याच्या तपासाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सर्जेराव कुंभार यांनी तपास पथकाचे अधिकारी सपोनि रविंद्र गोडसे यांना सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या योग्य त्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस स्टेशनकडील सपोनि गोडसे व पोलीस अंमलदार अजित फरांदे, कैलास साळुंखे, स्वप्नील जाधव, सागर जगताप, अमोल ढोणे, शुभम चिनके, मल्हारी सपुरे, सुधीर शिवले असे दोन टीम तयार केल्या. त्याप्रमाणे सपोनि रवींद्र गोडसे व वरील पोलीस अमलदार यांनी नमूद गुन्हेतील आरोपींचा उरुळी कांचन, यवत, दौंड परिसरात शोध घेऊन नमूद गुन्ह्यात आरोपी नामे १) गणेश संजय चौधरी, वय २९ वर्ष रा मु पो वाडेगाव, भोर वस्ती, ता हवेली जि पुणे २) ओंकार अंकुश लांडगे, वय २५ वर्षे रा मु पो वाडेगाव ता हवेली जि पुणे ३) दत्तात्रय भरत गाडे, वय २५ वर्ष धंदा चालक मु पो चंदनवाडी, बोरी भडक ता दौंड जिल्हा पुणे ४) प्रताप अंकुश अडसूळ, वय २२ वर्ष धंदा नोकरी रा तळवाडी चौक, हरी जीवन हॉस्पिटल मागे, उरुळी कांचन ता हवेली जि पुणे ५) महेंद्र दत्तात्रय गाडे, वय २३ वर्ष धंदा नोकरी रा मु पो पुसेवस्ती, साईनगर उरुळी कांचन ता हवेली जि पुणे यांना अटक करून त्यांची ०७ दिवस पोलीस कस्टडीची रिमांड घेऊन नमूद आरोपींकडून गुन्हा करण्यासाठी वापरलेली ०१ चार चाकी, ०३ दुचाकी वाहने, हवेत गोळीबार करण्यासाठी वापरलेले ०१ अग्निशस्त्र, ०१ जिवंत काडतूस असा एकूण ५,९७,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आलेला आहे. नमूद गुण्याचा पुढील अधिक तपास सपोनी रविंद्र गोडसे हे करीत आहे. सदरची कामगिरी मनोज पाटील, अप्पर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, हिम्मत जाधव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ४ पुणे शहर, प्रांजली सोनवणे, सहा पोलीस आयुक्त सो, येरवडा विभाग पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्जेराव कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर, सहायक पोलीस निरीक्षक, रविंद्र गोडसे, पोलीस अमलदार अजित फरांदे, कैलास साळुंखे, स्वप्नील जाधव, सागर जगताप, अमोल ढोणे, शुभम चिनके, मल्हारी सपुरे, सुधीर शिवले, गणेश दळवी यांनी केली आहे.

# रायगड, ठाणे ग्रामीण यांची पुरुषांत, पुणे शहर, पालघर यांची महिलांत साखळीत पहिल्या विजयाची नोंद

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२०, ठाणे :** रायगड, ठाणे ग्रामीण यांनी पुरुषांत तर पुणे शहर, पालघर यांनी महिलांत ७२ व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत साखळीतील पहिले विजय नोंदविले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असो.ने विश्वास सामाजिक संस्था व शारदा संकल्प प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ठाणे पश्चिम येथील कॅडबरी कंपनी जवळील भारतरत्न माजी पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी क्रीडांगणार झालेल्या दुसऱ्या दिवशी झालेल्या पुरुषांच्या सामन्यात रायगडाने क गटात नंदुरबारचा ३६-२८ असे नमविले. पहिल्या डावात चुरशीने खेळलेल्या या साम न्यात १४-१२ अशी रायगडकडे आघाडी होती. दुसऱ्या डावात आपला खेळ अधिक गतिमान करीत रायगडाने २ लोण देत सामना आपल्या बाजूने झुकविला. नंदुरबारने देखील एक लोन देत सामन्यात रंगत आणली. मिथुन मोकल, हृतिक पाटील, समीर हिरवे यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळाने रायगडने हा विजय साकारला.पृथ्वीराज गलांडे, सुशांत शिंदे यांनी नंदुरबार कडून उत्कृष्ट खेळ केला. ठाणे ग्रामीणने पुरुषांच्या ब गटात हिंगोलीचा ५८-२२ असा पराभव केला. म ध्यांतराला २४-११ अशी आघाडी घेणाऱ्या रायगडने दोन्ही डावात २-२ लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. मंगेश सोनवणे, अक्षय भोईर यांचा झंझावाती खेळ या विजयात महत्वाचा ठरला. हिंगोलीचा मंगेश खोकले बरा खेळला.

महिलांच्या इ गटात पुणे शहरने रायगडचा ३५-२१असा पराभव केला. पहिल्या सत्रात चुरशीने खेळल्या गेलेल्या या सामन्यात १२-११ अशी आघाडी पुण्याकडे होती. दुसऱ्या सत्रात मात्र आपला खेळ उंचावत सामना एकतर्फी केला. आम्रपाली गलांडे, हर्षा शेट्टी, सिद्धी मराठे यांच्या उत्तरार्धातील चतुरस्त्र खेळाने हा विजय मि ळाला. रायगडच्या रचना म्हात्रे, रश्मी म्हात्रे चमकल्या. पालघरने फ गटात ४२-३७ असे चकवित आगेकूच केली. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या





या सामन्यात शेवटच्या क्षणी हा विजय साकारला. विश्रांतीला २५-१३ अशी पालघरकडे आघाडी होती. अखेरच्या क्षणात सामन्यात चुरस निर्माण झाली. संजना भोईर, मोक्षा पुजारी, ज्युली मिस्किटा यांच्या संयमी खेळाने पालघरला हा विजय साकारता आला. धुळ्याच्या विद्या दोलतोडे, ज्योती डफळे यांनी चुरशीची लढत दिली. रात्री उशीरा झालेल्या उद्घाटनीय सामन्यात लातूरने पुरुषांच्या क गटात पूर्वार्धातील १२-२१ अशा १० गुणांच्या पिछाडीनंतर ठाणे शहर संघाला ३२- ३१ असे चकवित पहिल्या विजयाची नोंद केली. आक्रमक सुरुवात करीत पहिला लोण देत पूर्वार्धात ठाण्याने १० गुणांची आघाडी घेतली होती. पण पूर्वार्धातील हा जोश ठाणेकरांना टिकविता आला नाही. उत्तरार्धात लातूरने टॉप गिअर टाकत ठाण्यावर २ लोण देत आघाडी घेतली आणि सामना आपल्या नावे केला. अजिंक्य कातले, ऋषिकेश पांचाळ लातूरच्या विजयाचे शिल्पकार ठरले. ठाण्याच्या शक्तीसिंग यादव, मंथन दंत यांची खेळ उत्तरार्धात कमी पडला.

महिलांच्या सामन्यात देखील मुंबई उपनगर पूर्वने क गटात ठाणे ग्रामीणला ३८- ३० असे नमविले. शुभदा खोत, यशिका पुजारी, समृद्धी मोहिते यांच्या चढाई पकडीच्या चतुरस्त्र खेळाने उपनगरने दोन्ही डावात खेळावर आपले वर्चस्व ठेवले होते. निधी राजोळे, यतीक्षा बाबाडे यांनी ठाणे ग्रामीण कडून कडवी लढत दिली.अहमदनगरने पुरुषांच्या ब गटात नांदेडचा ६२-१२ असा सहज धुव्वा उडविला. शिवम पठारे, युवराज गवारे यांच्या तुफानी खेळानेच अहमदनगर ने हा मोठ्या गुणांच्या फरकाने विजय मिळविला. पुरुषांच्या ड गटात पुणे शहरने परभणीला ३६-३३ असे चकविले खरे, पण त्यासाठी त्यांना कडवा संघर्ष करावा लागला. जोशपूर्ण सुरुवात करीत परभणीने पहिला लोण देत १२-०१ अशी आघाडी घेतली. पण त्यातून सावरत पुण्याने ती आघाडी कमी करीत आणली. विश्रांतीला खेळ थांबला तेव्हा देखील १७-१६ अशी परभणीकडे एका गुणाची आघाडी होती. त्यानंतर मात्र पुण्याने आपला खेळ उंचावत सामना आपल्या बाजूने झुकविला. तेजस पाटील, दीपक सांगले, सुनील दुबिले यांच्या उत्तरार्धातील झंझावाती खेळाने बाजी पलटविली. परभणी कडून अंकुश भांडे, वैभव कांबळे, रत्नेश्वर घाडगे यांनी सुरुवात चांगली केली. पण शेवटी त्यांना संयम न राखता आल्याने परभणीला पराभवाचा सामना करावा लागला. गत विजेत्या पुणे ग्रामीणने अ गटात चुरशीच्या लढतीत नाशिक शहरचा ४५-४१ असा पराभव केला. मध्यांतराला २४-१६ अशी पुण्याकडे आघाडी होती. कबड्डी रसिकांची उत्कंठा वाढविणाऱ्या या सामन्यात दुसऱ्या डावात नाशिकला सुर सापडला. पण वेळेचे गणित नजुळल्याने त्यांना पराभव पत्करावा लागला. अजित चौहान, अक्षय सूर्यवंशी, ऋषिकेश भोजने पुणे ग्रामीण कडून, तर आकाश शिंदे, शकिब जावेद, दीपक आहेर नाशिक शहर कडून उत्कृष्ट खेळले. पिंपरी चिंचवडने महिलांच्या ड गटात परभणीला ५७-२४ असे पराभूत केले. मनिषा राठोड, सविता गवई यांच्या तुफानी खेळाला या विजयाचे श्रेय जाते. परभणी ची निकिता लंगोट एकाकी लढली.

# मोतीबिंदू मुक्त अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया अभियान

**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.२०, कळवण (नाशिक) :** दिनांक २० मार्च २०२५ रोजी रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा या उदात्त भावनेने मराठा विद्या प्रसारक समाजाच्या डॉक्टर वसंतराव पवार वैद्यकीय विद्यालय व संशोधन केंद्र यांच्या वतीने व मविप्र कार्यकारणीचे (कळवण सुरगाणा) तालुका संचालक रवींद्र बाबा देवरे यांच्या पुढाकाराने अभिनव बाल विकास मंदिर व जनता विद्यालय कळवण (नाकोडे) या विद्यालयात दिनांक २० मार्च २०२४ रोजी कळवन तालुका मोतीबिंदू मुक्त अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्र तालुका सदस्य रविंद्र बाबा देवरे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन पाटील शालेय व्यवस्थापन समिती सदस्य बाजीराव पगार, कारभारी पगार, वसंतराव सोनवणे, मेघनाथ पवार, सुभाष पगार, बाबुराव पगार, बाळासाहेब पगार, अमृत गुंजाळ आदिगण मान्यवर म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटन रवींद्र बाबा देवरे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रसंगी रविंद्र बाबा देवरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नेत्र तपासणीसाठी आलेल्या सर्व बंधू आणि भगिनी यांच्याशी संवाद साधताना शिबिराचे आयोजन करण्यामागचा हेतू काय हे सांगितले. त्याचबरोबर आवश्यक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया खर्च मविप्र संस्थेचे कळवण तालुका सदस्य या नात्याने मी स्वतः करेल असे आश्वासनही दिले. आजच्या शिबिरा प्रसंगी एकूण १७८ गरजू रुग्णांनी नेत्र तपासणीचालाभ घेतला. त्यापैकी



२७ रुग्ण यांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज आहे असे निदानातून स्पष्ट झाले असता त्या सर्व २७ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया संस्थेचे सदस्य रवींद्र बाबा देवरे यांनी स्वखर्चाने करण्याची जबाबदारी स्वीकारली.

सदर कार्यक्रमाची सूत्रसंचालन उपशिक्षिका मनीषा पवार व सोनाली म गर यांनी केले याचबरोबर विद्यालयातील उपशिक्षक विजय जाधव, अक्षय सोनवणे, उदय पाटील, महेश पाटोळे, प्रज्ञेश मोरे, महेश सोनवणे, कपिल पगार, दिनेश कोर , उपशिक्षिका मनीषा खैरनार, सोनाली कड,वर्षा बेडीस, रत्ना सूर्यवंशी, अस्मिता जाधव, अभया आहेर, योगिता खैरनार, सविता कुराडे, मंदाकिनी महाले तसेच शिक्षकेतर कर्मचारी तुकाराम जाधव, मनीष वाघ, अलका हिरे, गिरीश पवार, ज्ञानेश्वर जोपळे, उमेश हिरे, भगवान जाधव, नवनाथ हिरे, योगेश हिरे, ज्ञानेश्वर गावित, इत्यादीचे सहकार्य लाभले.

# बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील केस गळतीचे प्रकार रेशनच्या गव्हामुळे नाहीत - मेघना बोर्डीकर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात अचानक केस गळतीचे प्रकार दिसून आले आहेत. हे केसगळतीचे प्रकार रेशनच्या गव्हामुळे झालेले नाहीत. तसेच पाण्यामुळेही झाल्याचे दिसून येत नसल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डिकर साकोरे यांनी दिली. अल्पकालीन चर्चेदरम्यान सदस्य सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री मेघना बोर्डिकर साकोरे बोलत होत्या. यावेळी चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.



बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील केसगळतीचा प्रकार गंभीर असल्याचे सांगून राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या की, या केसगळतीचा प्रकार समोर आलेल्या प्रत्येक गावामध्ये घरोघरी सर्वेक्षण करण्यात आले आहे. या ठिकाणचे पाणी, माती, रक्ताचे नमुने तसेच गहू यांचे नमुने गोळा करण्यात आले. त्याच्या तपासणीसाठी आय सी एम आर कडे पाठवण्यात आले आहेत. आयसीएमआरचा अहवाल आल्यानंतर हे केसगळतीचे प्रकार कशामुळे घडत आहेत हे स्पष्ट होईल. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. तसेच या गावांम धील लहान मुले तसेच गर्भवती महिला यांचीही आरोग्याची तपासणी करण्यात आली आहे. तसेच राज्यात शासानामार्फत अनेक योजना राबवण्यात येत असतात. त्यामध्ये लाभार्थ्यंना धान्य वाटपापासून शिवभोजन, मध्यान्न भोजन अशा योजनांचा समावेश आहे. अशा थेट अन्न धान्य आणि खाद्यांनांशी संबंधित योजनांच्या वाटपाम ध्ये उत्कृष्ट दर्जाच्या अन्नधान्याचा आणि खाद्यांन्नांचे वाटप होते का नाही याची तपासणी करण्यात येते. या खाद्यांन्नांच्या तपासण्या आणखी कडक करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. आश्रमशाळा तसेच शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या मध्यान्न भोजनाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्याबाबत ही सूचना देण्यात आल्या आहेत. जर काही ठिकाणी यामध्ये हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असेही राज्यमंत्री मेघना बोर्डिकर साकोरे यांनी सभागृहात सांगितले.

# महसूल परिषदे अंतर्गत प्रशिक्षण संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, भंडारा :** शासनाने निर्धारित केलेल्या सात कलमी कार्यक्रमाचे अनुषंगाने प्रशासकीय कार्यपद्धतीत गतिमानता आणण्याच्या दृष्टीने अधिकारी कर्मचारी यांना विविध कार्यपद्धती अवलंबण्याबाबत दिनांक १९ व २० मार्च २०२५ रोजी या दोन दिवसाच्या कालावधीत महसूल परिषद अंतर्गत प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटनाला जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, प्रशिक्षक श्री. कुंडेटकर उपस्थित होते. महसूल परिषदेत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

महसूल विषयक बाबी जसे सातबारा, मृत्युपत्र, हिंदू वारसा कायदा, मुस्लिम वारसा कायदा शींल वर प्रशिक्षण देण्यात आले. त्याचप्रमाणे एक्ठचड, बायोमेट्रिक attendance system याबाबत ही माहिती देण्यात आली. प्रश्नोत्तराच्या वेळी बऱ्याच कर्मचाऱ्यांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. त्यांचे निरसन करण्यात आले असून याबाबत मार्गदर्शन ही करण्यात आले. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी सर्व कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिकांना देखील महसूल नियम कायदे कार्यपद्धती विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# थोडक्यात

## बिलोलीत सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, बिलोली (नांदेड) :** तालुक्यातील दगडापूर येथील सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा समितीच्या वतीने या ही वर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी आयोजन करण्यात आले असल्याचे समितीच्या वतीने कळवण्यात आले आहे. समितीची बैठक अमृतधाम गोशाळा कासराळी येथे लक्ष्मण ठक्करवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली आहे. सर्व धर्मिय सामूहिक विवाह सोहळा महादेव मंदिर दगडापूर समितीच्यावतीने आयोजनाचे हे २२ वे वर्ष आहे. सर्वच समाजातील लोकांनी या मोफत विवाह सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण ठक्करवाड यांनी केले आहे. या विवाह सोहळ्यातील वधु-वरांना लग्नाचा पोशाख व मणी, मंगळसूत्र तसेच लग्नात येणाऱ्या सर्व व्यक्तींची भोजनाची व्यवस्था, अशा प्रकारची व्यवस्था समितीच्या माध्यमातून करण्यात येत आहे. विवाह नोंदणीसाठी इच्छुक वधू - वरांनी लक्ष्मण ठक्करवाड यांचे संपर्क कार्यालय कासराळी, कुंचनवार मेडिकल बिलोली, विश्वनाथ दाचावार कुंडलवाडी यांच्याकडे नाव नोंदणी करावी, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे. सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या नियोजन बैठकीसाठी लक्ष्मण ठक्करवाड, माजी नगराध्यक्ष विजय कुमार कुंचनवार, साईनाथ उत्तरवार, सायन्ना ठक्कुरवाड, राजेश्वर कनकमवार, लक्ष्मण बोधनकर, प्रा.जयप्रकाश कमटलवार, अरविंद ठक्करवाड, शंकर गंगुलवार यांची उपस्थिती होती.

## ज्येष्ठ नाभिक समाजसेवक आबासाहेब उर्फ तुकाराम सोनवणे यांचे दुःखद निधन

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.२०, ठाणे :** नाभिक समाजातील ज्येष्ठ समाजसेवक श्री संत सेनाजी महाराज प्रगती मंडळाचे ज्येष्ठ सल्लागार तथा माजी अध्यक्ष, खानदेश भूषण आणि आनंद वधुवर विवाह ग्रुपच्या माध्यमातून महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशातील हजारो जोडप्यांच्या जीवनात वैवाहिक आनंद खुलविणारे अक्षदाचार्य आबासाहेब उर्फ तुकाराम झिपा सोनवणे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी बुधवार, दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. दिनांक २० रोजी सकाळी १० वाजता ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम जवळील जवाहर बाग मुक्तीधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी धुळे, जळगाव जिल्ह्यासह मुंबई, ठाणे आणि राज्याच्या विविध भागातील नाभिक बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी ठाण्यातील कोपिनेश्वर मंदिरात शुक्रवार, दिनांक २८ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ वाजता होणार असून अक्षगंध विधी त्यांच्या ठाण्यातील नक्षत्र गॅलेक्सी, लोढा सर्व्हिस रोड माजीवडा या निवासस्थानी होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने सांगण्यात आले आहे. दरम्यान तुकाराम सोनवणे यांच्या आकस्मित निधनाने नाभिक समाजाची कधीही भरून न निघणारी खुप मोठी हानी झाली आहे. समाजाने एक कोहिनूर हिरा गमावला तथा असा समाजसेवक पुन्हा होणार नाही. अशा प्रकारच्या दुःखद भावनांनी यावेळी नाभिक समाजातील विविध मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी पुष्पाताई, मुलगी माधुरी बोरसे असा परिवार असून सुप्रसिद्ध टीव्ही मालिका दिग्दर्शक आणि व्यवस्थापक हेमंत सोनवणे यांचे ते वडील होते.

## दापोलीत २१ ते २५ मार्च रोजी जिल्हास्तरीय सरस प्रदर्शन

**अक्षराज : उमेश ताबिब**

**दि.२०, दापोली (रत्नागिरी) :** उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद व पंचायत समिती दापोली यांच्या संयुक्त विद्यम ाने दिनांक २१ ते २५ मार्च २०२५ रोजी या कालावधीमध्ये दापोलीतील आझाद मैदानावर जिल्हास्तरीय सरस प्रदर्शन व विक्री २०२५ आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ.उदय सामंत, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. नव तेजस्विनींनी आपल्या कौशल्याने बनविलेल्या विविध वस्तू खरेदी करण्यासाठी आणि आपली समृद्ध संस्कृती व परंपरा जपणाच्या गोष्टींचा अनुभव घेण्यासाठी या महोत्सवाला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी केले आहे. जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन हे ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी स्वयंरोजगारातून उत्पादित केलेल्या विविध मालाच्या विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ मानले जाते. विक्री व प्रदर्शनामध्ये बचत गटांनी उत्पादित केलेली उत्पादने माफक दरात ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. या विक्री व प्रदर्शनामध्ये जिल्ह्यातीत एकूण ७५ स्वयंसहायता समूह सहभागी होणार आहेत. दापोली येथे पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देत असतात. त्याचा फायदा उत्पादित मालाची विक्री मोठ्या प्रमाणावर होण्यास होईल. प्रदर्शन कालावधीत संध्याकाळी स्वयंसहाय्यता समूहातील सदस्यांचे मनोरंजनपर लोककला, लोकगीत, भारुडे, वैयक्तिक व सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सहभागी स्टॉल प्रतिनिधी करीता फनी गेम आयोजित करण्यात येणार आहेत. दिनांक २२ मार्च २०२५ रोजी सहभागी स्वयंसहायता समूहातील उत्कृष्ट काम केलेले बँक शाखाधिकारी, महिला, राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त प्रभाग संघाचे आदींचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा सांगता समारंभ दिनांक २५ मार्च २०२५ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. उत्कृष्ट मांडणी व सर्वाधिक विक्री करणाऱ्या स्वयंसहाय्यता समूहाचा सत्कार यावेळी करण्यात येणार आहे.

## कोल्हापुर ते शिवतीर्थ पक्षध्वज पायी संकल्प यात्रा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, विंचूर (नाशिक) :** ऐन निवडणुकच्या तोंडावर पक्षांतर करणारे आयाराम-गयाराम असोत किंवा एखाद्या पक्षाने तिकीट नाकारले म्हणून बंडखोरी करणारे असोत या सर्वांत उठून दिसतो. हा सर्वसामान्य कार्यकर्ताच आणि तो जर मनसे चा महाराष्ट्र सैनिक असेल तर विषयच निराळा; असाच एक मु.पो. कोपरगांव(शिर्डी), जि.अहिल्यानगरचा महाराष्ट्र सैनिक प्रमोद ताराबाई प्रकाश आरणे यांनी मनसेच्या १९ व्या वर्धापन दिनी पक्षध्वज पायी संकल्प यात्रा करणार असा संकल्प केला. दिनांक १७ मार्च २०२५ रोजी कोल्हापूर महालक्ष्मी मंदिरात पुरोहितांकडून विधीवत ध्वज पुजन करुन अंबाबाईला आगामी काळात मनसेला निवडणूकीत घवघवीत यश मिळावे यासाठी साकडे घातले. प्रवासाला सुरुवात केली आहे. दिनांक २९ मार्च २०२५ रोजी 'शिवतीर्थ' या दादर स्थित राजसाहेबांच्या निवासस्थानी हा मनसैनिक पोहचणार आहे. पक्षाच्या गुढीपाडवा मेळाव्यात सहभागी होणार आहे. सदर संकल्प पुर्तीसाठी कोपरगांव तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्मान सेना कार्यकर्त्यांनी तसेच पक्ष पदाधिकार्यांनी शुभेच्छा दिल्या आहे.